नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५६/२०२१

निशाण क्रमांक ४५ / क सोबत

वादी तर्फे वकील एस. के. नंदगावे यांचे मार्फत प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ संतोष तानाजी सारंग याचा उलट तपास सुरु

१८. मी एस. टी. महामंडळ मध्ये वाहक म्हणून नोकरीस आहे. माझे मुळ गांव हसुरचंपू आहे. माझे वडील देखील एस. टी. महामंडळ मध्ये वाहक म्हणून नोकरीस होते. ते सध्या हयात नाहीत. हसुरचंपू येथे वडीलाचे घर आहे. हसुरचंपू हे गाव मोठे आहे.

१९. वादी व प्रतिवादी क्रमांक २,३ ४ यांची मला पूर्वीपासून माहिती आहे. प्रतिवादी क्रमांक २ चे वडील काशाप्पा हे मयत आहेत. काशाप्पा मयत झाल्यानंतर त्याला वारस यल्लाप्पा आणि परशराम आहेत. यल्लाप्पाला वादी, प्रतिवादी क्रमांक ३ व ४ हे वारस आहेत. हीच नावे सात बारा पत्रकी वारस म्हणून नोंद आहेत. हे मला माहित नाही की, परशराम व यल्लाप्पाच्या बहिणी याच्या मध्ये वाद आहे किंवा नाही हे मला माहित नाही. आनंदा व धनंजय याच्या बहिणी मध्ये वाद आहे. काशाप्पाच्या वारसांची माहिती मला पूर्वीपासून आहे.

२०. ३८२ चा पूर्वीचा रिव्हीजन सव्हे नंबर मला सांगता येणार नाही. त्याचे क्षेत्र १ हे. १२ आर. आहे. या मिळकतीचा सात बारा मी बघीतलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सात बारा पत्रकी परशराम काशाप्पा कांबळे यांचे ८ आणे क्षेत्र नमूद आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सात बारा पत्रकी धनंजय यल्लाप्पा कांबळे यांचे ८ आणे क्षेत्र नमूद आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, धनंजय, आनंद व विमल यांचे मिळून ८ आणे क्षेत्र नमूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, परशराम व धनंजय, आनंद व विमल यांचे क्षेत्र सामाईक आहे. हे मला माहित नाही की, सात

बारा पत्रकी या चौघांची नावे सामाईकात नोंद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, परशराम व यल्लाप्पाचे एकत्र कुंटूब आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, परशराम, आनंदा, विमल व धनंजय याचा सात बारा वेगवेगळा निघत नाही. गट नंबर ३८३ हा वादीचा आहे. यल्लाप्पा व परशराम याच्या मध्ये अंदाजे सन २००८ मध्ये वाटप झाले असेल. त्याचे वाटप तोंडी झालेले आहे. तोंडी वाटपाप्रमाणे पुढे त्याबाबतचा काही लेखी दस्त झाला का याबद्दल मला माहिती नाही. वाटपा बद्दल मला ऐकीव माहिती आहे. गट नंबर ३८२ व ३८३ व घर मिळकत कोण कोणाला गेली याबद्दल सविस्तर माहिती मला नाही. हे मला सांगता येत नाही की, जे काही वाटप झालेले आहे त्याचा अंमल सात बारा पत्रकी झालेला नाही.

२१. हे म्हणणे खरे नाही की, वहिवाटी बद्दल देखील माझी माहिती ऐकीव आहे. वहिवाटी वेगवेगळया होत्या हे दर्शविण्याकरीता मी लेखी पुरावा सादर करु शकतो अथवा नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी याच्या वाटण्या झालेल्या नाहीत व त्याच्या स्वतंत्र वहिवाटी देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीपत्राच्या अनुंषागाने मी खोटी माहिती सांगत आहे.

२२. गट नंबर ३८२ च्या दक्षिणेस गट नंबर ३८३ आहे व त्याला लागून आमची गट नंबर ३८४ ची जमीन आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस आनंदा कांबळे यांची जमीन आहे व पूर्वेस याच मिळकतीतील उर्वरीत जमीन आहे. तसेच पश्चिमेस रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील मिळकत ही गावापासून दूर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिळकतीच्या आजू बाजूला घरे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, चारी बाजूने रस्ते, क्रॉक्रटीकरण झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी पूर्वीपासून सामाईक मध्ये पिके घेतात.

२३. वादातील खरेदीपत्र दिनांक २३/०५/२०१६ ला केले आहे. सदरील खरेदी बाबत आठ दिवस आगोदर चर्चा झाली होती. खरेदी घेण्यापूर्वी पेपर मध्ये जाहीर प्रकटण दिले नव्हते. वकीलाकडून मिळकती बाबत शोध अहवाल

घेतला नाही. चर्चेच्या वेळेस सात बारा बघीतला होता. त्यावेळेस वादी व प्रतिवादी क्रमांक ३ व ४ यांची नावे दिसली.

प्रश्न - वरील लोकांना मिळकत घेण्या बाबत नोटीस देण्यास कुठली अडचण होती का ?
उत्तर - मी त्यांना तोंडी विचारले होते.

मी धनंजय याला विचारले तेंव्हा, तो गावीच होता. खरेदी करताना त्यांना मान्यतादार म्हणून घेण्यास कुठली अडचण होती का हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरील व्यवहार त्याच्या माघारी करावयाचा होता म्हणून त्यांना त्याबाबत नोटीस देखील पाठविलेली नाही तसेच त्याची समंतीदार म्हणून सही देखील घेतली नाही.

२४. निशाणी क्रमांक ६४ वरील खरेदीपत्र माझ्या समक्ष झालेले आहे. सदरील दस्तातील मजकूर माझ्या समक्ष लिहण्यात आला. सदरील दस्ता मधील मजकूर जो की, "सदरील जमीन शेती कामाकरीता घेतली आहे" हा बरोबर आहे. सदरील खरेदीदस्ता सोबत असलेल्या सात बारा मध्ये विहीर व बोअर असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही बागायत जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, तीन वर्षापूर्वीचा जोडलेला सात बारा हा तलाठी याच्याशी संगणमत करुन जोडलेला सात बारा आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, आमची मिळकत गट नंबर ३८२ ला लागून नाही.

२५. हे म्हणणे खरे नाही की, हा व्यवहार हा तुकडे जोड तुकडी बंदी कायदया विरुध्द झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत हसुरचंपू येथे तेली यांची सत्ता होती. परशराम हे गेली ३० वर्षे पोलीस पाटील म्हणून होते. सन २०१६ मध्ये ते पोलीस पाटील होते अथवा नाही याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्रमांक २ यांची आर्थीक परिस्थती चांगली

नव्हती. हे मी सांगू शकत नाही की, वादी व प्रतिवादी क्रमांक २,३ व ४ यांचे कुंटूब मागासलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याचे आर्थीक परिस्थती व मागासले पणाचा गैरफायदा घेवून बेकायदेशीर खरेदीपत्र करुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नही की, राजकीय प्रंभाव वापरुन दाखले उपलब्ध करुन घेतलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तसेच खरेदीनंतर फेरफार क्रमांक ३८०६ हा राजकीय वजन वापरुन करुन घेतलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सदरील फेरफार बद्दल वाद आज देखील पुणे आयुक्त याच्याकडे प्रलंबीत आहे.

२६. मनाईचा आदेश अस्तीत्वात असताना जमीन सन २०२४ मध्ये बिगरशेती करुन घेण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, सदरील आदेश व त्याचा फेरफार राजकीय वजन वापरुन करुन घेतलेला आहे. सदरील फेरफाराचा वाद देखील उपविभागीय अधिकारी याचेकडे प्रलंबीत आहे.

२७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रा मध्ये जागा ही घरबांधणी करीता घेतलेली आहे हे खोटे नमूद केले आहे. सुनिल संभाजी सारंग हे माझे चुलत भाऊ आहेत. जोतीराम मारुती पोवार हे माझे पाहुणे आहेत. ते गिजवणे येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, सुनिल संभाजी सारंग, जोतीराम मारुती पोवार व मी मिळून संगनमत करुन खोटे खरेदीपत्र करुन घेतलेले आहे. हे मला माहित नाही की, जोतीराम मारुती पोवार याचे दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये उटणे बसणे असते. हे म्हणणे खरे नाही की, खोटे कागदपत्र, खोटा नकाशा दाखवून खोटे खरेदीपत्र करुन घेतलेले आहे. परशराम याच्या वहिवाटीत वादग्रस्त मिळकत आहे हे दर्शविणारा कागद त्यांनी दिलेला नव्हता. खरेदीदस्ता व्यतीरिक्त ताबा दिले बाबत दुसरा लेखी दस्त नाही. हे म्हणणे खरे नाही की, मिळकती समाईकत असल्यामुळे कब्जा देण्याचा प्रश्न येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज देखील वादी व प्रतिवादी क्रमांक २ ते ४ आजही समाईकात तेथे पिके घेतात. हे म्हणणे खरे नाही की, आमची कधीही वादग्रस्त मिळकतीत वहिवाट नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दांडगाव्याने बांधकाम करीत असल्याने कोर्टाने ते बांधकाम थांबविलेले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, वकीलांनी जबाब बनविला व मी फक्त सही केली. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्रमांक १४ मधील मजकूर वकीलांनी लिहलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दांडगाव्याने केलेले खरेदीपत्राच्या आधारे दावा मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने खोटे खरेदीपत्र तयार केलेले आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक ०४/०८/२०२५

सही/-

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज